॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

॥ कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव ॥

**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon**

'A' Grade
NAAC Re-Accredited
(4th Cycle)

**प्रवेश व पात्रता विभाग**

जा.क्र.कबचौउमवि/०६/प्र.पा/१२४/ २०२४ — दि.०४.०९.२०२४

**परिपत्रक क्र.२८/२०२४**

**प्रति,**
**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी,**
**संलग्नीत सर्व कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालये, व्यावसायिक,**
**अव्यावसायिक अभ्यासक्रमांचे मा.प्राचार्य आणि मान्यता प्राप्त परिसंस्था यांचे मा.संचालक**
**तसेच शैक्षणिक प्रशाळा / विभाग यांचे मा.संचालक, विभागप्रमुख यांना..**

**विषय :-** शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये प्रथम वर्ष बी.सी.ए, बी.बी.ए , बी.बी.ए (ई-कॉमर्स) बी.एम.एस आणि बी.एम.एस ( ई-कॉमर्स ) वर्गात अनुत्तीर्ण असलेल्या विद्यार्थ्यांना व्दितीय वर्षात प्रवेश देण्याबाबत.

**महोदय / महोदया,**

आपणास विदितच आहे की, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून सर्व पदवी स्तरावर राष्ट्रीय शैक्षणिक धोरण -२०२० नुसार ४ वर्षांचे पदवी अभ्यासक्रम लागू केले आहे.

तथापि बी.सी.ए, बी.बी.ए, बी.बी.ए (ई-कॉमर्स ), बी.एम.एस आणि बी.एम.एस (ई-कॉमर्स), या वर्गांना राष्ट्रीय शैक्षणिक धोरण -२०२० नुसार ४ वर्षांचे पदवी अभ्यासक्रम लागू करण्यासंदर्भात सदरचे प्रस्ताव विचाराधिन होते. त्यानंतर या संदर्भात मा.विद्या परिषद सभेत खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आले आहे.

<u>ठराव क्र. वि.प.ए-१८०/२०२४, दि. ३१/०८/२०२४</u>

ब) शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून सदरचे अभ्यासक्रम लागू करण्यात येत असल्यामुळे व विद्यापीठाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२० ची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून सुरू करण्याचे निश्चित केल्यामुळे, बी.सी.ए. प्रथम वर्ष अनुतीर्ण विद्यार्थ्यांना द्वितीय वर्षात प्रवेश देण्यात यावा, असे सर्वानुमते ठरले.

आणि

<u>ठराव क्र. वि.प.ए-१८२/२०२४, दि. ३१/०८/२०२४</u>

ब) शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून सदरचे अभ्यासक्रम लागू करण्यात येत असल्यामुळे व विद्यापीठाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२० ची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून सुरू करण्याचे निश्चित केल्यामुळे, बी.बी.ए., बी.बी.ए. (ई-कॉमर्स) आणि बी.एम.एस., बी.एम.एस. (ई-कॉमर्स) प्रथम वर्ष अनुतीर्ण विद्यार्थ्यांना द्वितीय वर्षात प्रवेश देण्यात यावा, असे सर्वानुमते ठरले.

तरी वरील निर्णयांच्या अधिन राहून संबंधीत पात्र विद्यार्थ्यांना **दि.०६ सप्टेंबर २०२४** पर्यंत प्रवेश देऊन सदरची बाब महाविद्यालयातील विद्यार्थी,अध्यापक तसेच महाविद्यालयाचे कार्यालयीन कर्मचारी आणि अधिकारी यांच्या निर्देशनास आणून देऊन सहकार्य करावे, ही विनंती.

कळावे.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ 1990 'A' Grade NAAC Re-Accredited (4th Cycle) जळगाव-४२५००१

आपला विश्वासू

(राजेश चि.ठाकरे )
**सहायक कुलसचिव**
प्रवेश व पात्रता विभाग

**प्रत माहितीसाठी :**

१.मा.कुलगुरु कार्यालय, क.ब.चौ.उ.म.वि, जळगांव.
२.मा.प्र-कुलगुरु कार्यालय, क.ब.चौ.उ.म.वि, जळगांव.
३.मा.कुलसचिव कार्यालय, क.ब.चौ.उ.म.वि, जळगांव.
४.मा.संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, क.ब.चौ.उ.म.वि. जळगांव.
५.मा.वित्त व लेखा अधिकारी, क.ब.चौ.उ.म.वि, जळगांव.
६.समन्वयक ई-सुविधा केंद्र, क.ब.चौ.उ.म.वि. जळगांव.